## विश्वसनीय यात्रा :

# प्रेमपथावर अग्रेसर होणे

प्रिय मित्रहो,

सर्वच आध्यात्मिक साधकांचे एक समान ध्येय असते - स्व-परिवर्तन. बरेच अध्यात्मिक मार्ग गुरूवर अवलंबून राहण्याचा पुरस्कार करतात, परंतु जोपर्यंत आपण दुसऱ्या कुणावर तरी अवलंबून राहतो, तोपर्यंत परिवर्तन अशक्य बनते. जेव्हा आपण व्यक्तिशः ती जबाबदारी स्वीकारतो आणि म्हणतो, "मला काहीतरी केले पाहिजे," तेव्हाच परिवर्तन शक्य होते. अगदी ईश्वरावर अवलंबून राहणे म्हणजेसुद्धा जबाबदारी ढकलणेच असते.

जर मी माझ्या उन्नती आणि परिवर्तनासाठी गुरू किंवा इतर कोणाला जबाबदार धरत असेन, तर ते परिवर्तन घडून येणार नाही. कारण अगदी साधे आहे. ईश्वर किंवा गुरू यांनी आवश्यक ते सर्व आधीच केलेले आहे. आता एक साधक म्हणून, हे माझे काम आहे की, माझ्या हृदयात बीजरूपात काय दिलेले आहे याचे आकलन करून घेणे व ते ओळखून त्या बीजांना विकसित होऊन, बहरू देणे. प्रारब्धावर अवलंबून राहणे तर अधिकच निरर्थक आहे, जरी हे खरे असले तरी, की एक प्रकारे आपले प्रारब्ध आपल्या कर्मांनी आपणच निर्माण केलेले असते.

स्वतःमध्ये परिवर्तन घडवून आणण्याची तीव्र आकांक्षा असेल तर आपल्याला हे दिसून येते की आध्यात्मिकता (खास करून भारतीय परंपरेत) कर्म, ज्ञान आणि भक्तियोगाविषयी बोलते

- कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तीयोग. हार्टफुलनेस पद्धती खरोखरच या तीनही योगांचे अतिशय सुरेख मिश्रण आहे. तरीही अशा मार्गावरून चालतानासुद्धा आपल्याला अनेक खाच-खळग्यांना सामोरे जावे लागते, कारण आपण कर्म आणि ज्ञान यांना वाजवीपेक्षा जास्तच महत्त्व देतो. त्यांचा अतिरेक झाला तर ते या मार्गाच्या सूक्ष्मतेच्या विरुद्धच ठरते.

तुम्ही आध्यात्मिक उंचीवरून पतन झाल्यामुळे ब्राह्मणांचे ब्रह्मराक्षस आणि अत्यधिक उंची गाठलेले योगी पतन झाल्यामुळे योगभ्रष्ट झाल्याची उदाहरणे ऐकली असतील. त्यांची यौगिक यात्रा अनेक कारणांमुळे अपूर्ण राहिली. ज्ञानी आणि कर्मी यांचे पतन होऊ शकते, परंतु तुम्ही कधी भक्ताचे पतन झाल्याचे ऐकले आहे का? भक्तिभ्रष्ट असा शब्द कधीच अस्तित्वात येऊ शकत नाही, कारण भक्त हा नेहमी ईश्वराच्या संरक्षणात असतो. शरणागती प्राप्त केलेल्या, अत्याधिक आदराने समर्पण केलेल्या कोणाचेही ईश्वर रक्षण करतो. समस्या तेव्हा निर्माण होते, जेव्हा आपण कर्ता बनतो. आत्तापर्यंत कोणत्याही भक्ताचे कधीही आध्यात्मिक पतन झालेले नाही. ते होऊ शकत नाही. जर तसे झाल्यासारखे वाटत असेल तर त्याचा अर्थ इतकाच की तिथे खऱ्या भक्ती किंवा शरणागतीची उणीव होती.



शरणागती प्राप्त केलेल्या, अत्याधिक आदराने समर्पण केलेल्या कोणाचेही ईश्वर रक्षण करतो. समस्या तेव्हा निर्माण होते, जेव्हा आपण कर्ता बनतो. आत्तापर्यंत कोणत्याही भक्ताचे कधीही आध्यात्मिक पतन झालेले नाही. ते होऊ शकत नाही.

माझी सहजमार्गाशी पहिल्यांदा ओळख करून दिली गेली, तेव्हा माझ्या प्रशिक्षिका भगिनी द्रौपदी यांनी मला एक मूलभूत प्रश्न विचारला, “तुम्हाला ध्यान का करायचे आहे?”
मी उत्तरलो, “मी ईश्वराचा शोध घेत आहे.”

आज बऱ्याच गोष्टी वेगळ्या प्रकारे समजून आल्यावर, जेव्हा मागे वळून मी माझ्या व्यक्तिगत श्रद्धांचा विचार करतो, तेव्हा कळते की त्या वेळी मी किती चुकीचा होतो. जरी आपल्यापैकी बरेचजण असे म्हणत असले की मी ईश्वराचा शोध घेत आहे, तरीही आता ती गोष्ट मला हास्यास्पद वाटते. छोट्या गोष्टी कदाचित नजरेस पडणार नाहीत, परंतु सर्वव्यापी अस्तित्व आपल्या नजरेतून कसे सुटू शकते? ते सर्वत्र असूनही आपल्या नजरेस

मुळात आपण त्याच्यापासून विलग कसे झालो,
ज्यामुळे आता आपल्याला त्याचा शोध घेण्याची
गरज भासते आहे? तो हरवलेला संपर्क पुन्हा
स्थापित करण्यासाठी, आपल्याला त्या गोष्टी
ओळखून काढून टाकाव्या लागतील
ज्यामुळे आपण विलग झालो.
हीच खऱ्याखुऱ्या यात्रेची सुरुवात आहे.

पडत नाही, अगदी तसेच जसे संपूर्ण आयुष्य त्याच्यातच घालवूनही माशाला समुद्राविषयी काहीच कल्पना नसते. पर्यायाने आपण ईश्वराची कल्पना अनंताला मीतींचे परिमाण लावून करतो व गोंधळात पडतो, कारण आपण अस्तित्वाची अती दूर असलेली दोन्ही टोके कधी पाहिलेली नाहीत आणि त्यांची कल्पनाही करू शकत नाही. त्याच्या अनंतत्वाच्या स्तरावर दिव्यत्व अधिकच अदृश्यपणा धारण करते.

मी त्याचा शोध घ्यायला सुरुवात केली तरी माझ्या मर्यादित आकलनशक्तीने मी त्याचे आकलन कसे करू शकणार, जोपर्यंत त्याच्या बाजूनेही एक प्रकारचा शोध सुरू होत नाही? अनंत हे आकलनाच्या पलीकडे आहे - ते लघुत्तमापेक्षा लघुत्तम आणि महत्तमापेक्षा महत्तम आहे, याचा अर्थ कसा समजून घ्यायचा? यात आणखी एक अडचण अशी की स्थूल कधीच सूक्ष्माला जाणू शकत नाही.

त्यामुळे पूज्यभाव आणि अतीव आदराने स्वीकारलेली शरणागती हाच एकमेव मार्ग उरतो.

वो दिल कहां से लाऊं, जो तुझे पहचाने!

माझ्या हृदयाला तुझी ओळख कशी पटावी!

या सर्वांच्याही पलीकडे आपल्यासमोर एक मूलभूत कोडे असते : मुळात आपण त्याच्यापासून विलग कसे झालो, ज्यामुळे आता आपल्याला त्याचा शोध घेण्याची गरज भासते आहे? तो हरवलेला संपर्क पुन्हा स्थापित करण्यासाठी, आपल्याला त्या गोष्टी ओळखून काढून टाकाव्या लागतील ज्यामुळे आपण विलग झालो. हीच खऱ्याखुऱ्या यात्रेची सुरुवात आहे.

कल्पना करा की तुम्ही समुद्रकिनाऱ्यावर आहात व उसळणाऱ्या लाटांचा आनंद घेत आहात. परंतु तुम्हाला समुद्रातील खोलवरचे पाणी दिसत नाही, कारण तुम्हाला फक्त पृष्ठभागावरील लाटा दिसत असतात. लाटाही विचारत आहेत, “समुद्र कोठे आहे?”

त्याही बेचैन होऊन शोध घेत आहेत. ज्याक्षणी त्या शांत होऊन नाहीशा होतात, त्याक्षणी पृष्ठभागावरील लाटा समुद्राशी एकरूप होतात आणि मग सर्व स्पष्ट दिसते.

लाटा हे विसरतात की त्यांचे मूळ समुद्रच आहे. म्हणजे त्या तिथूनच उत्पन्न होतात आणि त्यातच लय पावतात. लाटा आणि समुद्र एक होण्याची गुरुकिल्ली आहे त्यांचे शांत होणे व विरून जाणे, स्थिर होणे. पूर्ण नाहीसे होणे म्हणजे मृत्यू. त्यामुळे आपण निदान मृत्यूच्या गुणवैशिष्ट्यांची नक्कल करून ते आत्मसात करू शकलो, 'मरजीवा' म्हणजेच 'जिवंत-मृत' बनू शकलो, तर आपल्या हृदयात स्वीकारार्हता आपोआपच जन्माला येईल. त्या मूळ महासागराशी एकरूप होण्याच्या पवित्र क्षणाची सुरुवात होईल, मूळ समाधी अवस्थेसारखी स्थिती. शारीरिक मृत्यूने समस्या सुटत नाही. खरेतर समस्या आपल्या सूक्ष्म शरीरामध्ये लपून बसते आणि जन्म-मृत्यूचे हे चक्र अनंत काळ चालू राहते.

विरून जाण्याची कला. प्रियतमाच्या प्रेमामध्ये त्याला संपूर्ण वश होण्याची कला, म्हणजेच भक्ती. नेमके सांगायचे तर, जेव्हा आपण स्वतःच्या पलीकडे निघून जातो तेव्हाच समस्येचे उत्तर सापडते.

> जब मैं था तब हरि नहीं, अब हरि है मैं नाही|
> सब अंधियारा मिट गया, दीपक देखा माही ||
>
> 'मी'पणाचा भ्रम म्हणजेच तो अंध:कार आहे, ज्यामुळे आपल्याला ईश्वर दिसत नाही. जेव्हा तो हृदयात असतो, तेव्हा तेथे केवळ प्रकाश असतो आणि आपल्या स्वतःच्या उपस्थितीचा अंधकार गायब असतो.

आपण निदान मृत्यूच्या गुणवैशिष्ट्यांची नक्कल करून ते आत्मसात करू शकलो, 'मरजीवा' म्हणजेच 'जिवंत-मृत' बनू शकलो, तर आपल्या हृदयात स्वीकारार्हता आपोआपच जन्माला येईल. त्या मूळ महासागराशी एकरूप होण्याच्या पवित्र क्षणाची सुरुवात होईल, मूळ समाधी अवस्थेसारखी स्थिती.

जाणिवेची अंतिम सीमा म्हणजे संपूर्ण दैवीकरण. जाणिवेची उंची आणि खोली आपल्याला चेतनेच्या समुद्रातच सापडू शकते. हे आपल्याला समजून आले की आपल्याला प्रिय बाबूजींच्या या गहन प्रश्नाचा अर्थ कळून येतो, “चेतनेला कशाचा आधार असतो?” आपण प्रेम आणि उदात्ततेला नाकारतो तेव्हाच आपल्या स्वतःच्या अस्तित्वाची उंची आणि खोली आपल्या नजरेआड होते आणि जाणिवेचा एक मर्यादित हिस्सा आपल्या वाट्याला येतो.

आपला आंतरिक दिशादर्शक गमावून बसलेल्या किंवा त्याची दिशा संपूर्णपणे दिव्यत्वाचा अगदी विरुद्ध बाजूला केंद्रित असलेल्या माणसापेक्षा अधिक गरीब, दुःखी व एकाकी किंवा तुच्छ कोणीही नसतो. भक्ती किंवा प्रियतमाविषयीचे आत्यंतिक प्रेम, भावनिक लाटांमधील आणि असण्या व बनण्यामधील चढ-उतारांना काढून टाकून दिव्यत्वाचा एकसमान एकसंघपणा साध्य करते. याउलट प्रियतमाच्या जाणिवेपासून दूर जाणे वेदना आणि क्लेशांना आमंत्रण देते.


भक्ती किंवा प्रियतमाविषयीचे आत्यंतिक प्रेम,
भावनिक लाटांमधील आणि असण्या व
बनण्यामधील चढ-उतारांना काढून टाकून
दिव्यत्वाचा एकसमान एकसंघपणा साध्य करते.
याउलट प्रियतमाच्या जाणिवेपासून दूर जाणे
वेदना आणि क्लेशांना आमंत्रण देते.



यहुदी परंपरेत पापाची व्याख्या अगदी नेमकेपणाने ‘पूजनीय गोष्टीपासून दूर भरकटणे’ अशी केलेली आहे. बाबूजी म्हणतात की कृतघ्नता हे पाप आहे. आपण कृतघ्न बनतो तेव्हाच नेमकेपणाने आपली खऱ्या संबंधांपासून दूर जायला सुरुवात होते. कृतघ्नता हीच पथभ्रष्ट होण्याची सुरुवात असते. म्हणून ते पाप आहे. तिथे प्रेमाचे अस्तित्व उरत नाही आणि म्हणून नाते संपुष्टात येते. हे नाते संपुष्टात आणून तुम्ही कुठे जाणार? कल्पना करा की लाटेला प्रश्न विचारला आहे, “हे प्रिय आणि उत्तुंग लाटे तू समुद्राला सोडून कुठे जाणार?”

या दृष्टिकोनातून पाहिले तर कोणत्याही प्रकारचे भरकटणे, ज्यात आपली जाणीव भौतिक संपत्ती, शरीर, मन, बुद्धी किंवा अहंकाराशी संलग्न असते ते केंद्रापासून, जीवनाच्या

स्रोतापासून किंवा आत्म्यापासून दूर जाणेच असते. आपल्या अस्तित्वाची मायेशी किंवा अहंकाराशी असलेली ओळख बाबूजी 23 वर्तुळांच्या रेखाचित्राच्या साहाय्याने, संख्या पद्धतीने किती सुंदर व सोप्या रीतीने दाखवून देतात. यात मायेची केवळ पाच वर्तुळे आहेत, तर अहंकाराची 11. याचा अर्थ एवढाच की आपल्याला केंद्राकडून परिघाकडे ढकलणारा अहंकारच असतो. अहंकार हा मायेपेक्षा कितीतरी अधिक शक्तिशाली अडथळा असतो. हा एक प्रकारचा भ्रम असतो.



ऋषी पतंजली याला 'भ्रांतीदर्शन' म्हणजे चुकीचे आकलन असे म्हणतात. मी भौतिक संपत्ती कमावण्याच्या विरोधात नाही, परंतु बाह्य समृद्धी आणि संपत्तीवरून स्वतःची ओळख ठरवणे हे आंतरिक दारिद्र्याचे लक्षण आहे. अशी संपत्ती केवळ भ्रांती म्हणजे भ्रम किंवा असुरक्षितता निर्माण करते. अशा ओळखीतून निर्माण झालेल्या चुकीच्या कल्पनांनी आयुष्य चालत राहते. आपल्यामधील उत्तमातील उत्तम लोकांनासुद्धा ही वास्तविकता समजून येत नाही.

भ्रम, अज्ञान, अंध:कार आणि आजाणतेपणाच्या सावलीत जगलेले जीवन नरकासमान असते. याउलट स्पष्टता, निरागसता आणि प्रसन्नतेने जगलेले जीवन हे स्वर्गीय जीवन असते. हेच भक्तीचे व ती ज्या गोष्टींना चालना देते त्यांच्यातील सौंदर्य आहे. ज्या दिवशी आपल्याला अंध:कारमय जीवन जगण्याचा खऱ्या अर्थाने उबग येतो, त्या दिवशी अतिशय वैतागून आपण जाहीर करतो, "इथून पुढे मी अंतरंगात जाण्यास मदत करणारी जीवनशैली अंगिकारणार आहे."

ही समुद्राच्या पृष्ठभागावरील लाटा संपुष्टात येण्याची सुरुवात असते. सर्व प्रकारच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी दररोज कराव्या लागणाऱ्या प्रयत्नांमधून निर्माण होणारे संघर्ष एक प्रकारची तपस्या बनून जातात. जर ती तपस्या बनली तर आपण नक्कीच निव्वळ कर्तव्यपूर्तीकडून प्रियतमासाठी प्रेमपूर्वक केलेल्या कर्तव्यपूर्तीकडे जाणार आणि हाच मार्ग पुढे परिपक्व होऊन निष्कलंक भक्तीमध्ये परिवर्तित होऊ शकतो.

> भ्रम, अज्ञान, अंधकार आणि आजाणतेपणाच्या
> सावलीत जगलेले जीवन नरकासमान असते.
> याउलट स्पष्टता, निरागसता आणि प्रसन्नतेने
> जगलेले जीवन हे स्वर्गीय जीवन असते.
> हेच भक्तीचे व ती ज्या गोष्टींना चालना
> देते त्यांच्यातील सौंदर्य आहे.



भक्तीचा अर्थ जाणिवेच्या प्रकाशात जीवन जगणे असाही असतो, ज्यात आपण जीवनातील सर्व द्वंद्वांमधून जात असल्याची जाणीव व स्वीकारार्हता असते. ध्यान ही केवळ मानसिक क्रिया नसून ती मन व शरीराच्या पलीकडे जाणारी गोष्ट आहे. बरेच लोक तक्रार करतात की विविध प्रकारच्या विचलित करणाऱ्या गोष्टींमुळे यांचे ध्यान रुळावरून घसरते. परंतु भक्तीने केलेले ध्यान एखाद्याला त्या अदृश्याचे आकलन अधिक नेमकेपणाने करवून देते, कारण आता मन कोणत्याही प्रकारच्या जाणीवपूर्वक अथवा उत्स्फूर्त प्रभावापासून मुक्त असते. विचलितपणा हा मनाच्या अनेक प्रकारे भरकटण्याचा अंतिम परिणाम असतो. हे

मानसिक भरकटणे आपल्या स्वत:च्या अपरिहार्यतेच्या परिणामस्वरूप असते ज्यांना आपण संस्कार म्हणतो.

संस्कार हळूहळू काढून टाकत मनाला प्रशिक्षित करणे ही बहुतेकांच्या बाबतीत अतिशय सावकाशपणे होणारी प्रक्रिया आहे. जेव्हा संस्कार हळूहळू आंतरिक मोकळिकीला जागा करून देतात, तेव्हा त्या आंतरिक वातावरणाशी जुळवून घेण्यास आपल्याला खूप वेळ लागतो. तेव्हा मग आपल्या लक्षात येते की केवळ दु:ख सहन करण्याच्या बाबतीतच नाही तर आनंद सहन करण्याच्या बाबतीतही आपल्याला मर्यादा आहेत.



भक्तीचा अर्थ जाणिवेच्या प्रकाशात जीवन जगणे असाही असतो, ज्यात आपण जीवनातील सर्व द्वंद्वांमधून जात असल्याची जाणीव व स्वीकारार्हता असते. ध्यान ही केवळ मानसिक क्रिया नसून ती मन व शरीराच्या पलीकडे जाणारी गोष्ट आहे. बरेच लोक तक्रार करतात की विविध प्रकारच्या विचलित करणाऱ्या गोष्टींमुळे यांचे ध्यान रुळावरून घसरते. परंतु भक्तीने केलेले ध्यान एखाद्याला त्या अदृश्याचे आकलन अधिक नेमकेपणाने करवून देते, कारण आता मन कोणत्याही प्रकारच्या जाणीवपूर्वक अथवा उत्स्फूर्त प्रभावापासून मुक्त असते.

आपल्या साधनेच्या किंवा ती साधना आपल्याला प्रदान करणाऱ्याच्या बाबतीत आनंदाची किंवा दु:खाची स्थिती येणे स्वाभाविकपणे गुंतागुंतीचे असते. जोपर्यंत आपल्या इच्छा पूर्ण होत असतात तोपर्यंत आपल्यात अधिकाधिक श्रद्धा विकसित होत जाते. ज्या क्षणी आपली एखादी इच्छा बराच काळ उलटूनही पूर्ण होत नाही, तेव्हा आपण संस्थेवर, साधनेवर, किंवा गुरूवर अविश्वास दाखवण्यास सुरुवात करतो. मी असे घडताना अगदी दररोज पाहत असतो. उदाहरण म्हणून सांगायचे तर, एका साधकाने लिहिले, “दाजी माझी अवस्था अतिशय चांगली आहे. तुमच्या आशीर्वादाने माझ्या मुलीचे आता लग्न झाले आहे व मी पूर्णपणे मोकळा आहे. मला आता कोणतीही काळजी नाही आणि संपूर्ण आयुष्यभर मी तुमची सेवा करायचे ठरवले आहे.” काही आठवड्यांनंतर तीच व्यक्ती तक्रार करू लागली अगदी माझ्यावर पक्षपाताचाही आरोप करू लागली आणि जेव्हा मी याचे कारण विचारले तेव्हा त्याने अगदी स्पष्टपणे सांगितले, “तुम्ही तिच्या आजारपणात माझ्या पत्नीला मदत केली नाही. आता ती या जगात नाही. मी अगदी मनापासून तुम्हाला प्रार्थना केली पण बघा काय झाले? आता माझा विश्वास उडाला आहे, मी ध्यान करू शकत नाही. बाबूजी असते तर फार बरे झाले असते. त्यांनी नक्कीच माझ्या बायकोला बरे केले असते.”

दररोज अशा प्रसंगांना सामोरे जात असताना आपल्याला नारद भक्तिसूत्रामधील 54व्या सूत्रातील सुज्ञपणाचे कौतुक वाटल्याशिवाय राहात नाही.

गुण रहितं कामना रहितं प्रतिक्षण-वर्धमानं,
अविच्छिन्नं सूक्ष्मतरं अनुभव-रूपम् |
(नारदभक्तिसुत्राणि 54)

भक्ती ही भौतिक गुण व कामनारहित असते.
ती सतत वाढत असते,
अतिशय सूक्ष्म व अनुभवगम्य असते.

खरी भक्ती बक्षीस न मिळणे किंवा बक्षीस मिळणे अशा गोष्टींच्या परिणामस्वरूप हेलकावे खात नाही. ती तुम्हाला तुमच्या जोडीदाराच्या किंवा मुलांच्या सहवासाचा आनंद लुटण्यास प्रतिबंध करत नाही. अशा भक्तांच्या बाबतीत जेव्हा परिस्थिती प्रतिकूल बनते, तेव्हा ते तिचा स्वीकार आनंदाने व कृतज्ञतेने करतात. भक्तीमध्ये कोणतीही अट नसते. ती मन आणि हृदय, तर्क आणि भावना यांच्या पलीकडे असते. भक्ती हा जीवन समृद्धी - शुद्ध चेतनेच्या स्तरावर पोहोचण्यासाठीचा एकमेव प्रभावी घटक आहे.

प्रेम हा भक्ताचा विशेषाधिकार असतो. प्रेम म्हणजे देणे. करुणा म्हणजे देणे. याउलट तीव्र लालसा लुबाडणे व इतरांचा फायदा उचलण्याशी संबंधित असते. करुणामय हृदयाला वाट कशी बघायची ते माहीत असते. याउलट विकारवश माणसाला थांबणे जमत नाही. तेव्हा आपण सहज असा निष्कर्ष काढू शकतो की कलियुग असो की सत्ययुग, एक गोष्ट शाश्वत असते, विकारवश माणूस कधीच स्वतःवर विश्वास ठेवू शकत नाही. वाढत्या प्रमाणात प्रेम करत जाणाऱ्या मनुष्यातसुद्धा विश्वासाच्या बाबतीत अनिश्चितता असते. कधी त्यांचा स्वतःवर विश्वास असतो तर कधी ते इतरांवर विश्वास ठेवतात. (याचाच अर्थ असाही होतो की कधीकधी ते स्वतःवर विश्वास ठेवत नाहीत, तर कधीकधी ते इतरांवर विश्वास ठेवत नाहीत.) भक्ती अंगी बाणवलेल्या माणसाची ईश्वरावर परिपूर्ण श्रद्धा असल्यामुळे त्याचा विश्वास प्रभूच्या ठायी असतो. असे रूपांतरण उदात्त व उन्नत बनवणारे असते. भक्ताचा विश्वास कधीच कमी होत नाही, तो सतत वाढतच असतो.

भक्ती अंगी बाणवलेल्या माणसाची ईश्वरावर
परिपूर्ण श्रद्धा असल्यामुळे त्याचा विश्वास
प्रभूच्या ठायी असतो. असे रुपांतरण उदात्त व
उन्नत बनवणारे असते. भक्ताचा विश्वास कधीच
कमी होत नाही, तो सतत वाढतच असतो.

1981 मध्ये अहमदाबादमध्ये असताना बाबूजींनी अगदी साधा संदेश दिला. ते खुशालभाई पटेलांबरोबर साऊथ आफ्रिकेच्या दौऱ्यावर निघणार होते आणि आमच्याबरोबर केवळ दोनच रात्री थांबले होते. हा अतिशय साधा संदेश अजूनही माझ्या कानात घुमत राहतो,

> "राहें तलब में ऐसे बेख़बर हो गए,
> मंज़िल पे आके मंज़िल को ढुंढते हैं |
>
> ते त्यांच्या शोधात इतके हरवून गेले होते की
> ध्येय गाठल्यावरही ध्येयाचा शोध घेत होते.

हे शब्द ऐकून मी आनंदाने बेभान झालो. त्यांनी आपल्याला आपण ध्येयावर पोचलो असल्याची खात्री दिली! भक्तासाठी खरेतर मार्गच ध्येय बनू शकतो आणि ही नक्कीच त्यांच्या कृपेची आणि दयेची किमया असते. कारण आपल्या बाजूने तर आपण काहीच केलेले नसते.

> आपल्या सर्व साधना या आदरयुक्त, निष्ठावान
> आणि शरणागत हृदये तयार करण्यासाठी
> आहेत. रिक्त झालेल्या हृदयाची ही तयारीच
> परमतत्वाला आकर्षित करते. याचा अंतिम
> परिणाम किंवा परिणती दिव्य करुणा आणि
> कृपेमुळेच शक्य होते, आपण तयार किंवा सज्ज
> आहोत म्हणून नाही.

ईश्वर किंवा गुरूबद्दल काय? जर ईश्वर कशाचीही मागणी करत असेल तर तोही याचकच झाला. आपण त्याला आपल्या स्तरावर खाली आणू शकत नाही. द्वंद्वांच्या आणि जिवंत-मृत अवस्थेच्या पलीकडे गेलेले आणि परमतत्त्वात लय पावलेले सद्गुरू कधीतरी त्यांच्या शिष्यांना त्यांची पूजा करू देतील का? ते कधीच स्वतःचे महत्त्व, कीर्ती किंवा प्रसिद्धीच्या शोधात नसतात. समर्थ गुरूंचे हे गुण लक्षात ठेवणे कदाचित आपल्याला फसवणुकीपासून दूर ठेवेल. एक भक्त म्हणून आपण त्याच्याशी एकतानता साधण्यास शिकले पाहिजे, जो आपल्याला लक्ष देण्यायोग्य, आपल्या आदरास व प्रेमास पात्र आढळला आहे.

आपण स्वप्रयत्नाने जे काही मिळवू ते ईश्वराने दिलेल्या भेटींच्या तुलनेत फिकेच पडेल. आपली तपश्चर्या आणि इतक्या वर्षांच्या निष्ठेने केलेल्या साधनेनंतरही परमतत्त्वाने संपूर्णपणे आपल्या हृदयात अवतरीत व्हावे अशी मागणी आपण करू शकत नाही. आपल्या सर्व साधना या आदरयुक्त, निष्ठावान आणि शरणागत हृदये तयार करण्यासाठी आहेत. रिक्त

झालेल्या हृदयाची ही तयारीच परमतत्त्वाला आकर्षित करते. याचा अंतिम परिणाम किंवा परिणती दिव्य करुणा आणि कृपेमुळेच शक्य होते, आपण तयार किंवा सज्ज आहोत म्हणून नाही. यामुळेच आपल्याला भगवद् गीतेतील दुसऱ्या अध्यायातील 47 व्या प्रसिद्ध श्लोकातील सुज्ञपणाचे महत्त्व कळून येते.

> कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन |
> मा कर्मफलहेतुर्भुर्मा ते संगोऽस्त्वकर्मणी ||
>
> तुमचे नियोजित कर्तव्य करण्याचा तुम्हाला अधिकार आहे,
> परंतु तुमच्या कृतींच्या फळावर तुमचा अधिकार नाही.
> स्वतःला कधीही तुमच्या कृतींच्या परिणामामागचे कारण
> समजू नका आणि कधीही तुमच्या कर्तव्यास चुकू नका.

प्रार्थनामय हृदयाने,

कमलेश

4 जुलै 2021
कान्हा शांती वनम

पूज्य श्री चारिजी महाराजांच्या
94 व्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने
24 जुलै 2021

heartfulness
advancing in love